**उलटतपासणी प्रतिवादी क्र.०१ व ०२ तर्फे विधीज्ञ श्री. आर. बी. सावंत यांचेमार्फत.....**

०१.     हे म्हणणे खरे आहे की, दिपक भागीराम खांडेकर हा माझा मुलगा आहे, तो सुशिक्षीत आहे, त्याला चालता–फिरता येते, इतर वादींनी माझे लाभामध्ये अखत्यारपत्र करुन दिलेले नाही, प्रतिवादी क्र.०२ चालू–फिरु शकतो. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तूतचे दाव्यामध्ये माझ्या वकीलांनी दाखल केलेली तसेच प्रतिवादींनी दाखल केलेली कागदपत्रे मी बघीतली आहेत.

०२.     हे म्हणणे खरे आहे की, वैजप्पा मंजूनाथ पडियार यांनी दावा मिळकतीच्या अनुषंगाने सन १९९० मध्ये मुळ वादी क्र.०१ ते ०३ यांच्या सोबत करार केला होता, सदर करारावरुन वैजप्पा पडियार यांनी मुळ वादींचे विरोधात अलिबाग येथील न्यायालयामध्ये दावा देखील दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, मुळ वादींनी वाद मिळकतीच्या अनुषंगाने वैजप्पा पडियार याचे विरुद्ध प्रांत अधिकारी, रोहा यांचे कार्यालयात आर.टी.एस. अपील दाखल केले होते, सदर अपीलाचा निकाल वादींचे बाजूने लागला, त्यावरुन वैजप्पा पडियार यांचे नाव वाद मिळकतीचे अभिलेखामधून कमी करण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मुळ वादींनी वाद मिळकत विक्री करण्याचा व्यवहार प्रतिवादी क्र.०१ सोबत केला होता. हे म्हणणे खरे आहे की, अलिबाग येथील दिवाणी दाव्याचे कामाकरीता व प्रांत अधिकारी यांचे कार्यालयातील आर.टी.एस. अपीलचे काम बघण्याकरीता मी व वादी क्र.०२ व ०३ जात होतो, त्याकरीता आम्ही वकीलांची नेमणूक केली होती, सदर कामांचे अनुषंगाने माझे वकीलांकडे येणे–जाणे होते.

०३.     हे म्हणणे खरे आहे की, वैजप्पा पडीयार याने आम्हाला साठे

करारापोटी दिलेली रक्कम आम्ही त्याला परत केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वाद मिळकतीच्या अनुषंगाने प्रतिवादी क्र.०१ व इतर सात व्यक्ती असा एकूण आठ व्यक्तींसोबत व्यवहार केला होता. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकतीच्या अनुषंगाने मी रोहा येथील न्यायालयामध्ये एकूण ०५ व अलिबाग येथील न्यायालयामध्ये एकूण ०२ दावे दाखल केले आहेत.

०४.        मी खरेदीखत नि.क्र.८२ वाचलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखतावर माझी लिहून घेणार, लिहून देणार किंवा साक्षीदार म्हणून सही नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, सदर खरेदीखतावर दस्तूर म्हणून त्याची सही आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला लिहिता–वाचता येते.

०५.        हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकतीचे अनुषंगाने मिळणारी रक्कम धनादेशाने प्रतिवादी क्र.०१ कडून स्विकारण्याचे मी व मुळ वादी मध्ये ठरले होते, त्या प्रमाणे खरेदीखत नि.क्र.८२, परिच्छेद क्र.०८ मध्ये आवश्यक तपशिल नमुद आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, ठरल्याप्रमाणे त्याला सदरील मोबदला मिळाला नाही.

०६.        हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तूतचा दावा दाखल करण्यापुर्वी मी विधीज्ञ श्री. मालोरे यांचे मार्फत सर्व प्रतिवादींना नोटीस पाठविली होती. आता मला दि.२८/१०/२०१३ रोजीची नोटीस दाखविण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, सदर नोटीसमध्ये पान क्र.०२ वरील शेवटचे परिच्छेदामध्ये पहिल्या ओळीतील मजकूर ''आपण क्र.०१ ने सदर दस्तात आमचे अशिलास बँक ऑफ बडोदा शाखा ग्रामदेवी मुंबई धनादेश क्र.००००००६ दिला होता'' हा नमुद आहे. प्रतिवादीचे वकीलांनी सदरील नोटीसची नक्कल प्रत उलटतपासणी दरम्यान रेफर केल्यामुळे त्यास **नि.क्र.१३०** देण्यात येते.

प्रश्न – तुमचे कथनाप्रमाणे वादी नारायण खांडेकरचे बँकेमध्ये खाते नव्हते तरी देखील तुम्ही वाद मिळकतीचा मोबदला धनादेशाव्दारे घेण्याचे ठरले होते त्या अनुषंगाने वाद पत्रामध्ये खुलास केलेला नाही ?

उत्तर – प्रतिवादीने तयार केलेला दस्त आम्हाला वाचून दाखवला नव्हता.

०७. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी नारायण खांडेकरचे बँकेमध्ये खाते नसल्याचे मी खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, दि.२६/०८/२०११ रोजी वाद मिळकतीचे अनुषंगाने एकूण आठ खरेदीखते झाली होती. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, त्या दिवशी केवळ चार खरेदीखते झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्याप्रमाणे चार धनादेश वाद मिळकत विकत घेणा–या व्यक्तींनी तयार ठेवले होते. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकतीचे अनुषंगाने करण्यात आलेल्या खरेदीखतावरुन संबंधीतांचे नावे फेरफार नोंदी देण्यात आल्या, त्यांचे नावांची नोंद ७/१२ उता–यामध्ये देखील घेण्यात आली. हे म्हणणे खरे नाही की, सदरील फेरफार नोंदीस वैजप्पा पडियार याने हरकत घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.०१ चे नाव वाद मिळकतीचे ७/१२ उता–याला लावल्याचे विरुद्ध मी महसूल खात्याकडे अपील दाखल केले नाही.

०८. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकतीचा मोबदला म्हणून दिलेला धनादेश न वटल्यास केलेले खरेदीखत रद्द समजण्यात येईल, असा मजकूर खरेदीखतामध्ये नमुद नाही, त्यामुळे झालेले खरेदीखत रद्द करण्यात यावे अशी मागणी मी प्रस्तूत दाव्यामध्ये तसेच इतर दावा दाखल करुन केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखत नि.क्र.८२ मध्ये पान क्र.०४ वर येणेप्रमाणे ठरली किंमत पुर्णपणे मिळावी, भरण्याची तक्रार नाही, वेगळे भरणे पावतीची आवश्यकता नाही, हा मजकूर नमुद आहे, त्याचप्रमाणे सदर खरेदीखत पान क्र.०६ वर देखील येणेप्रमाणे वर भरण्यात लिहिलेप्रमाणे खरेदीखताची पुर्ण रक्कम मिळाली, हा मजकूर नमुद आहे.

०९. हे म्हणणे खरे आहे की, मी दाव्यासोबत दाखल केलेल्या ७/१२ उता–यामध्ये वाद मिळकतीचा ताबा मी किंवा मुळ वादी यांचेकडे आहे असे नमुद नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, परंतू त्याने वाद मिळकतीचा ताबा प्रतिवादी क्र.०१ यास दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दस्त नि.क्र.८२ मध्ये पान क्र.०४ व ०६ वर वाद मिळकतीचा ताबा

खरेदीखत लिहून घेणार यास दिल्याबाबत मजकूर नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादपत्र व माझे पुराव्याचे प्रतिज्ञापत्रामध्ये वाद मिळकतीचा मोबदला प्रतिवादी क्र.०१ ने आम्हाला दिला, त्यामुळे आम्ही त्याला ताबा दिला हा खरेदीखतातील मजकूर खोटा व खोडसाळ असल्याचे त्यामध्ये स्पष्टपणे नमुद नाही.

१०.	हे म्हणणे खरे आहे की, दि.२६/०८/२०११ रोजी मी तसेच मुळ वादी क्र.०१ ते ०३ निबंधक कार्यालय, रोहा येथे गेलो होतो, त्या दिवशी इतर लोक देखील सदर कार्यालयामध्ये त्यांचे व्यवहारांची नोंदणी करण्याकरीता आले होते, खरेदीखत नि.क्र.८२ ची नोंदणी करायला दूपारी ०४.३० वाजले होते, त्या दिवशी साधारणपणे दोन ते अडीच तास आम्ही निबंधक कार्यालयामध्ये होतो, खरेदीखत नि.क्र.८२ साहेबांकडे हजर केल्यानंतर माझे वडीलांचे फोटो घेण्यात आले, त्यांचा त्यावर अंगठा घेण्यात आला, आम्ही निबंधक साहेबांसमोर खरेदीखतावर सह्या करुन नंतर बाहेर आलो. हे म्हणणे खरे आहे की, मुळ वादी क्र.०१ ते ०३ यांनी प्रतिवादी क्र.०१ ने त्यांना खरेदीखताचा मोबदला दिल्याबाबत मजकूर वाचून दाखविला नाही, अशी त्यांच्याकडे तक्रार केली नव्हती, त्याचप्रमाणे त्यांनी निबंधक यांचेकडे त्यांना खरेदीखताचा मोबदला मिळाला नसल्याबाबत देखील तक्रार केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही तहसिलदार किंवा महसूल खात्याकडे खरेदीखत नि.क्र.८२ चा मोबदला आम्हाला मिळाला नसल्याबाबत तक्रार केली नाही.

११.	हे म्हणणे खरे आहे की, दस्त नि.क्र.८२ झाल्यानंतर मी किंवा मुळ वादींनी प्रतिवादी क्र.०१ ने मोबदल्यापोटी द्यावयाचा धनादेश अजून दिला नाही, अशी तक्रार आमचे वकीलांकडे केली नव्हती, त्या अनुषंगाने आम्ही प्रतिवादी क्र.०१ ला वकीलांमार्फत नोटीस पाठवीली नाही. हे म्हणणे खरे आहे की, नोटीस नि.क्र.१३० मध्ये नारायण खांडेकर यांचे बँकेमध्ये खाते नाही असा मजकूर नमुद नाही.

१२.	हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.०१ ने वाद मिळकतीचे अनुशंगाने

दिलेला मोबदला नारायण खांडेकर यांना मिळाला होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.०१ ने धनादेश देतो असे म्हणून तो दिला नाही, हे मी खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीचा ताबा आज देखील माझ्याकडे असल्याचे मी खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचा आज देखील मीच मालक नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.१०/११/२०१३ रोजी प्रतिवादी क्र.०१ ने वाद मिळकतीवरील माझे ताब्याला हरकत घेतल्याचे मी खोटे नमुद केले.

१३.    हे म्हणणे खरे आहे की, दस्त नि.क्र.८२ चे अनुषंगाने माझी व नारायण खांडेकरची फसवणूक झाल्याचे अनुषंगाने आम्ही पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दस्त नि.क्र.८२ चा व्यवहार पुर्ण झाल्यामुळे व आम्हाला मोबदला मिळाल्यामुळे मी, माझा मुलगा, वडील नारायण व वादी क्र.०२ व ०३ यांनी त्यावर सह्या केल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, सदरील खरेदीखताच्या अनुषंगाने मिळालेला धनादेश वटवून आम्ही पैसे घेतलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींकडून अधिकचे पैसे घेण्याकरीता मी प्रस्तूतचा खोटा दावा न्यायालयात दाखल केला, खोटे शपथपत्र दाखल केले व आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**प्रतिवादी क्र.०३ ते ०६ व त्यांचे विधीज्ञांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. करिता त्यांचे विरुद्ध उलटतपास निरंक.**

श्रवणोत्तर स्विकृत,

SUNIL SAKHARAM MAHALE
Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2024.11.27 17:36:40 +0530

स्थळ : रोहा.                    (एस. एस. महाले)
दि.२७.११.२०२४                    दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रोहा.